# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि-१३/विवि/**४१**/२०२१
दिनांक : ~~१६.०७.२०२१~~
०२.०८.२०२१

प्रति,
**मा.प्राचार्य/विभागप्रमुख,**
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : विद्यार्थ्यांची सनद..**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ३१ (यठ) अंतर्गत विद्यार्थ्यांची सनद तयार करण्याकरीता दिनांक २१.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक ३८ मधील प्रस्ताव क्रमांक ६ अन्वये विद्यार्थ्यांची सनद तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली होती.

गठीत करण्यात आलेल्या समितीने विद्यार्थ्यांची सनद तयार केलेली असून समिती सभेच्या कार्यवृत्तास दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळ सभेत विषय क्र.२९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच व्यवस्थापन परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ३१ (यठ) नुसार विद्यार्थ्याची सनद यास दिनांक २९ जून, २०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ११४ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर विद्यार्थ्याची सनद विद्यार्थ्यांच्या माहितीकरीता आपणांकडे पाठविण्यात येत आहे. कृपया विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी :
१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३) सर्व सन्माननिय सदस्य, विद्यार्थी विकास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
## - विद्यार्थ्यांची सनद -

अखंड भारताच्या गौरवात भरीव योगदान देणारे उदार व जबाबदार तरुण निर्माण करण्याचे कल्पित उद्दिष्ट विद्यापीठाचे आहे. समाजासाठी सेवा देतांना, विद्यापीठाने संत गाडगे बाबांच्या दशसुत्रीच्या सिध्दांताची संपूर्ण अंमलबाजावणी करण्यासाठी त्यांचे अनुसरण केले आहे. अलीकडेच, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून ज्ञानाचा प्रसार आणि प्रचार, अध्यापन आणि संशोधन विकास, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण शिक्षण, विस्तार आणि सेवा याआधारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा हे विद्यापीठाचे उद्दिष्ट होय. विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना सर्वाधिक महत्व देत अध्यापन, शिक्षण आणि संशोधन या सर्व गुणवत्तांच्या आघाडीवर सर्वोत्तम कार्य करुन समाज आणि देशाच्या विकासामध्ये हातभार लावत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना अत्युत्तम मानसिक, भावनिक तसेच शैक्षणिक वातावरण प्रदान करण्यासाठी कटिबध्द आहे.

विद्यार्थीकेंद्रित वातावरणात विद्यापीठामध्ये उच्च दर्जा राखण्यासाठी आणि दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करीता प्रत्येक भागधारकांची विशिष्ट भूमिका असते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण आणि अनुभव प्रदान करणे ही विद्यापीठाची प्रमुख जबाबदारी आहे. सोबतच विद्यार्थ्यांना देखील त्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्यांची जाणीव असणे आवश्यक आहे, यामुळे विद्यापीठाला विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण चांगल्या पध्दतीने देण्यात मदत होईल. यास अनुरुप, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, ३१(यठ) च्या तरतुदींनुसार व्यवस्थापन परिषदेने विद्यार्थ्यांची सनद तयार करण्यासाठी व प्रत्यक्ष अवलंबविण्यासाठी समिती गठीत करण्यात आली. त्यानुसार, या दस्तऐवजाद्वारे शिक्षण आणि संशोधनाच्या अनुषंगाने उत्कृष्टता प्राप्त करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ तसेच विद्यार्थ्यांना आपापले हक्क, जबाबदाऱ्यांची आणि विशेषधिकारांची व्याख्या आणि परिभाषित करण्यात येत आहेत. सदर समितीमध्ये अध्यक्ष म्हणून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.प्रफुल्ल गवई, तर सदस्य म्हणून (व्य.प.स.) श्री.उत्पल टोंगो, (व्य.प.स.) श्री.सुनील मानकर, (व्य.प.स.) प्राचार्य डॉ. मीनल ठाकरे (भोंडे), डॉ.राजेश बुरंगे, प्र-संचालक, रासेयो, डॉ.दिनेश सातंगे, संचालक, विद्यार्थी विकास तथा समिती सचिव म्हणून कार्य पाहत आहे. विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण प्रदान करणारी तसेच विद्यार्थ्यांकडून देखिल गुणवत्तापूर्वक शिक्षण स्विकारणारी जबाबदारी निश्चित करणारी ही सनद होय. याचा उहापोह सदर सनद मध्ये करण्यात आला आहे.

**विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांविषयीच्या जबाबदाऱ्या**

- सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाची प्रमुख उद्दीष्टे सांगून त्यास अपेक्षित असलेले गुण अंगीभूत करण्यासाठी प्रेरणा देणे.
- विद्यापीठाच्या उद्दीष्टांशी सुसंगत असे अभ्यासक्रम आणि कार्यक्रम प्रदान करणे.
- अध्ययन स्वातंत्र्याची गरज ओळखून विद्यार्थ्यांना त्यांची क्षमता प्राप्त करण्यास प्रवृत्त करणारे सहाय्यक आणि सर्वसमावेशक शैक्षणिक वातावरण प्रदान करणे.
- प्राविण्य प्राप्त करण्यासाठी उत्कृष्ट अध्यापन आणि अध्ययन प्रदान करणे.
- अध्यापन, शिक्षण आणि मुल्यांकन धोरणाची मुलभूत तत्वे अवलंबणे.
- विद्यार्थ्यांना त्यांचे नामांकन, अभ्यास, कायदा, सेवा आणि प्रक्रिया तसेच त्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्या या संदर्भात वेळेवर, अचूक आणि उपयुक्त माहिती प्रदान करणे.
- पसंती आधारीत श्रेयांक पध्दतीचा (Chioce Based Credit System) वापर करुन पुरेशी शैक्षणिक लवचिकता असलेल्या विस्तृत अभ्यासक्रमाची उपलब्धता देणे.
- परीक्षा आणि मूल्यांकन प्रणाली अत्यंत विश्वसनीय आणि वैध करणे. सबंधित धोरणे, आर्थिक सहाय्य आणि विद्यार्थी समर्थन सेवा आहेत का ? याची खात्री करणे.
- अभ्यासक्रम, सुविधा, मानव संसाधन यांचे सातत्यपूर्ण पुनरावलोकन करुन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रशासनाबद्दल अभिप्राय संकलित करणे.
- प्रामाणिकपणाने सर्व विद्यार्थ्यांना निःपक्ष, समानतेची आणि आदराची वागणूक देणे.
- भेदभाव, गुंडगिरी आणि धमकीपासून मुक्त असे सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण प्रदान करण्यासाठी समर्पित प्रयत्न करणे.
- निःपक्ष, पारदर्शक, कार्यक्षम तक्रार निवारण केंद्र उभारणे आणि अपिल प्रक्रिया प्रदान करणे.
- सर्व विद्यार्थ्यांमध्ये जीवन मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि चांगले नागरिकत्व ह्यांची जाणीव होण्यासाठी प्रोत्साहन देणे
- विद्यमान विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीत्व आणि समर्थन करण्यासाठी माजी विद्यार्थी संघटना बळकट करणे.
- विचारांची देवाणघेवाण आणि विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी उद्योगाशी तसेच संबंधित संघटनेशी संबंध प्रस्थापित करणे.

- विधेयकात अंतर्भूत असणाऱ्या विद्यार्थ्यांशी निगडीत सर्व बाबी जसे की धोरणे, कायदे, अधिसूचना, अध्यादेश, दिशानिर्देश इ. सर्व विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध करून देणे.

**विद्यापीठाप्रती विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्या**

- विद्यापीठातंर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम, प्रवेश धोरण, नियम व कायद्यांची जाणीव ठेवणे.
- महाविद्यालय/विद्यापीठात वर्गकक्षात उपस्थिती, अभ्यासक्रम, विषय आणि मूल्यांकन यासंदर्भात आवश्यक बाबींची पूर्तता करून स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रामाणिक प्रयत्न करणे.
- विद्यापीठाच्या अध्यापन-शिक्षण धोरणे आणि मूल्यांकन प्रणालीची जाणीव ठेवणे, अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमात सकारात्मक सहभाग घेऊन स्वतःचे अध्ययन सांभाळण्याची जबाबदारी घेणे.
- अभ्यासपूर्ण दृष्टिकोन बाळगणे आणि त्यांच्या अभ्यासाच्या सर्व बाबींमध्ये एकनिष्ठता दर्शविणे.
- अध्यापन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने विद्यापीठात शिक्षण संसाधने व इतर सहाय्य सेवांचा अधिकतम उपयोग करणे.
- वेळोवेळी अस्सल अभिप्राय देऊन शिक्षण आणि संशोधनाच्या गुणवत्तेत सुधारणा होणाच्या प्रक्रियेत भाग घेणे.
- विद्यापीठाने मान्य केलेल्या शुल्काचा योग्य वेळात भरणा करुन, विद्यापीठाच्या भौतिक सुविधा याबाबत विचार करुन येथील अधिकारी, कर्मचारी, सहकारी विद्यार्थी, परिसरातील लोकांशी आदरपूर्वक वागणे.
- सकारात्मक आणि विधायक पद्धतीने शिक्षण आणि संशोधन कार्यात भाग घेणे.
- अभ्यासपूर्ण सचोटीची तत्त्वे टिकवून ठेवणे, अभ्यास आणि मूल्यांकन करण्यासाठी नैतिक आणि प्रमाणिक दृष्टिकोन दर्शविणे.
- विद्यापीठाची धोरणे आणि अभ्यासक्रमाशी संबंधित कार्यपद्धतीची वेळ जाणून घेण्यासाठी, विद्यापीठाच्या नियमांचा व कायद्यांचा मनःपूर्वक स्वीकार करून संबंधित कायद्याच्या आवश्यकतांचे पालन करावे.
- क्रीडा, सांस्कृतिक, प्लेसमेंट्स, इंटर्नशिप्स, फील्डवर्क आणि कार्यक्षेत्रातील अनुभवासाठी व्यावसायिक पद्धतीने विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणे.
- योग्य रीतीने वागणे आणि इतरांना वागणूक देणे, धमकावणे किंवा यासारखे केले जाणारे वर्तन टाळावे.
- तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या निवारण प्रक्रियेचे अनुसरण करणे.

**(डॉ. दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
## - Student Charter -

As envisioned mission of the University to create a generous and responsible youth contributing to glorify India. While serving for the society, University follows Dashasutri (Ten Priciples) endorsed by Saint Gadge Baba to uplift it in entirety. Recently, Maharashtra Public University Act, 2016 has set students as a center point by putting an object to disseminate, create and preserve knowledge and understanding by teaching, research and development, skill development, training and education, extension and service and on the basis University has an object of Students' all around development. University values its students and recognizes the importance of quality in teaching, learning and research in development of the society and eventually nation. And it is dedicated to provide a compassionate academic environment nurturing student psyche piloting them towards excellence.

In the student centric ambiance every stakeholders has a unique role to play in maintaining high standards and ensuring quality education in the University. The students have the right to quality education and it is the prime responsibility of the University to provide quality educational environment and experience to the learners. The students have to be aware of their rights and responsibilities and this will help the University to impart quality education to the learners in a better way. Analogous to this, MPU 2016, 5 (45) prescribed enforcement of the students charter under powers and duties of the university. The Management Council under the provisions of MPU 2016, 31(zl) has to develop and adopt students' charter. Accordingly, this document defining and conferring rights, responsibilities and privileges to the students in the University with the aim of achieving excellence in pursuit of education and research through quality assurance.

The complete thought envisaged, is conceptualized by Committee Member & Management Council Member Nemely Dr.Prafull Gawai, Chairman, Shri Utpal Tongo (M.C.Member), Shri Sunil Mankar (M.C.Member), Dr. Meenal Thakare (Bhonde) (M.C.Member), Dr. Rajesh Burange, Director, NSS, Members & Dr. Dinesh Santange, Director, Students Development, Member Secretary framed this 'Students' Charter' that articulates the reasonable expectations that students should have towards the University while studying. It also documents what the University imparts to its students to enhance and sustain the quality education.

**University's Responsibilities towards its Students**

- To State, Communicate and Inculcate the qualities expected in the goals and objectives of the University for all the students.
- To provide programmes and Courses that are consistent with University goals and objectives.
- To provide supportive and inclusive learning environments that recognize academic freedom and motivate students to achieve their potential.
- To provide excellent teaching and learning proficiencies.
- To adopt core principles of the Teaching, Learning and Evaluation Policy.
- To provide timely, accurate and useful information to students in relation to their course of enrolment, study, legislation, services and processes as well as to their rights and obligations as a student.
- To offer a wide range of programmes with adequate academic flexibility using Choice Based Credit System.
- To make sure that the examination and evaluation systems are reliable and valid policies, financial aid and student support services.

- To collect feedback on Programmes, Facilities, Human Resource and administration to review and redesign to improve upon.
- To behave with integrity and treat all students fairly and equitably and with respect.
- To make dedicated efforts to provide a safe and inclusive environment that is free from discrimination, bullying and intimidation.
- To Provide fair, transparent and efficient complaints and appeals procedures.
- To promote values, social responsibilities and good citizenry in all students.
- To strengthen Alumni Association in representing and supporting current students.
- To establish associations with industry related organizations to exchange thoughts and make students employable.
- To keep all the legislation like Policies, Acts, Statutes, Ordinances, Directions, etc. easily accessible for all the students.

**Student's Responsibilities towards University**

- To be aware of the programmes, admission policies, rules and regulations of the University.
- To make sincere efforts to progress academically by meeting expectations associated with attendance, course, subject and assessment requirements.
- To be aware of the teaching-learning strategies and evaluation systems of the University and take responsibility for managing their own learning by being an active participant and positively engaging in their programme of study.
- To adopt a scholarly approach and demonstrate integrity in all aspects of their studies.
- To make optimum use of the learning resources and other support services available in the University with the help of teaching and nonteaching staff.
- To participate in processes which will lead to improvements in the quality of teaching, learning and research by providing genuine feedback within the time frame.

- To make timely payment of charges made by the University, respect the physical environment of the University and behave respectfully towards staff, fellow students and neighbours on campus and in the local community.
- To participate in learning and research activities in a positive and constructive manner.
- To uphold principles of scholarly integrity and demonstrate an ethical and honest approach to study and assessment.
- To acquaint themselves with the timeline of University policies and procedures relevant to their enrolment and course of study, adhere to the rules and regulations of the University as they apply to students, and comply with the requirements of relevant legislation.
- To represent University in a professional manner when engaged in University-related activity, including sports, cultural, placements, internships, fieldwork and work experience.
- To behave in an appropriate manner and avoid conduct that might reasonably be perceived, or considered, as discrimination, bullying or intimidation.
- To follow student redressal procedures to resolve complaints.

(**Dr.Dineshkumar Satange)**
Director,
Student Development,
Sant Gadge Baba Amravati University